**कृपया प्रसिध्दीसाठी** **29 ऑक्टोबर 2012**

# दिशा भरकटलेल्या पेट्रोलियम खात्याला मंत्रीबदलाची नव्हे, तर ठोस धोरणाची गरज: राम नाईक

**मुंबई,सोमवार:** ''पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांना 'अजब तुझे सरकार' असेच म्हटले पाहिजे. पेट्रोलियसारख्या अत्यंत संवेदनशील खात्याचे गेल्या आठ वर्षात चार मंत्री झाले. सतत मंत्री बदलण्यापेक्षा ठोस धोरण आखले तरच भरकटलेले पेट्रोलियम क्षेत्राचे तारु योग्य दिशेला वळेल'', अशी टीका माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी केली आहे. मंत्रीमंडळ पुनर्रचनेमध्ये काल चौथ्यांदा पेट्रोलियम मंत्री बदलले गेल्यामुळे श्री.नाईक यांनी ही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. 1963 मध्ये स्वतंत्र पेट्रोलियम मंत्रालयाची निर्मिती झाली, तेव्हापासून ते 2012 पर्यंत सलग पाच वर्षे पेट्रोलियम मंत्री राहिलेले श्री. राम नाईक हे एकमेव मंत्री आहेत.

''पंतप्रधान श्री.अटल बिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात निश्चित धोरण आखल्यामुळेच पेट्रोलियम क्षेत्रात देश प्रगती करु शकला. आम्ही वर्षभरात गॅस जोडणीसाठी प्रतिक्षेत असलेल्या एक कोटीहून अधिक ग्राहकांना नव्या जोडण्या देऊ शकलो, तर उलट युपीए सरकारने विद्यमान ग्राहकांनाही पुरेसे सिलेंडर न देण्याची आणि त्याची किंमत वाढविण्याची घोषणा केली. आम्ही परदेशी गुंतवणूक, नवे उत्खनन, ओएनजीसीचा कायाकल्प, इथेनॉलचे पेट्रोलमध्ये मिश्रण, आदी विविध मार्गांनी पेट्रोलियम पदार्थांचा स्त्रोत वाढविला, तर मनमोहन सिंहांच्या सरकारने पेट्रोलियम पदार्थांची आयात 70 टक्क्यांवरुन 80 टक्क्यांवर नेऊन पेट्रोलियम क्षेत्रात अराजकता निर्माण केली. आठ वर्षांमध्ये इतके अधःपतन होण्यामागची कारणे शोधण्यासाठी पंतप्रधानांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. सतत मंत्री बदलत राहाण्यापेक्षा पेट्रोलियम विभागासाठी ठोस धोरण निश्चित करुन त्याची काटेकोर अंमलबजावणी केली तर अनागोंदी थांबेल'', असे मत श्री. नाईक यांनी व्यक्त केले.

''दस-याच्या अगोदर गॅस पुरवठा आखडता घेऊन आणि दामदुपटीने भाव वाढवून काँग्रेस सरकारने 'आम आदमी'चा सणासुदीचा आनंद हिरावून घेतला. आता दिवाळीच्या तोंडावर केवळ खातेपालट केल्याने सामान्य माणसाला काय लाभ होणार. त्यापेक्षा पंतप्रधानांनी ठोस धोरण आखून चुकीचे निर्णय बदलले असते तर ते निश्चितच स्वागतार्ह झाले असते'', असेही श्री. राम नाईक अखेरीस म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**